# १३० दिवसांत २ लाख कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री

## एफपीआय बाजारावर नाराज

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांची विक्रीची धूम कमी होण्याची कुठलीही चिन्हे दिसत नाहीत. परदेशी गुंतवणूकदारांच्या जलद विक्रीमुळे देशांतर्गत गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे. मे महिन्यातही भारतीय शेअर बाजारातून परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांचा (एफपीआय) बहिर्वाह सुरूच होता. जागतिक स्थूल-आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, एफपीआयने या महिन्यात आतापर्यंत भारतीय शेअर बाजारातून १४,२३१ कोटींची रक्कम काढली. एनएसडीएलच्या आकडेवारीनुसार, यामुळे २०२६ मधील भारतीय शेअर बाजारातील एफपीआय विक्री २ लाख कोटींच्या पुढे गेली आहे. संपूर्ण २०२५ वर्षांत, एफपीआयने भारतीय बाजारातून १.६६ लाख कोटी काढले. या वर्षीचा फेब्रुवारी महिना वगळता २०२६ सालातील सर्व महिन्यांमध्ये एफपीआय विक्रेते राहिले आहेत. जानेवारीमध्ये त्यांनी ३५,९६२ कोटी काढून घेतले. तथापि, फेब्रुवारीमध्ये त्यांनी २२,६१५ कोटींची गुंतवणूक केली, जी १७ महिन्यांतील सर्वाधिक होती. मात्र, मार्चमध्ये हा कल उलटला. परदेशी गुंतवणूकदारांनी विक्रमी १.१७ लाख कोटींच्या शेअर्सची विक्री केली. एप्रिलमध्ये त्यांनी ६०,८४७ कोटींच्या शेअर्सची विक्री केली. मे महिन्यातही हाच कल कायम राहिला, ज्यात एफपीआयने आतापर्यंत १४,२३१ कोटींच्या शेअर्सची विक्री केली आहे.




### जलद विक्रीमुळे देशांतर्गत गुंतवणूकदारांत चिंता वाढली

**१.६६ लाख**
कोटी रुपये काढले २०२५ मध्ये

**वर्ष २०२६ सद्यस्थिती**

| महिना | बहिर्वाह |
|---|---|
| जानेवारी | ३५,९६२ कोटी |
| फेब्रुवारी | २२,६१५ कोटी |
| मार्च | १.१७ लाख कोटी |
| एप्रिल | ६०,८४७ कोटी |
| मे | १४,२३१ कोटी |

### परदेशी गुंतवणूकदार भारतातील क्षेत्रांत गुंतवणूक

मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंट रिसर्च इंडियाचे मुख्य व्यवस्थापक (संशोधन) हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की, एफपीआयच्या विक्रीचे मुख्य कारण जागतिक स्थूल-आर्थिक अनिश्चितता आहे. परदेशी गुंतवणूकदार विशेषत: महागाई, व्याजदर आणि भू-राजकीय जोखमींबद्दल चिंतित आहेत. श्रीवास्तव यांनी असेही सांगितले की, भारतीय रुपयावरही दबाव आहे. त्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांच्या डॉलर-समायोजित परताव्यावर परिणाम होत आहे. एकूण विक्री असूनही, एफपीआय वीज, बांधकाम आणि भांडवली वस्तू यांसारख्या निवडक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करित आहेत.



### विकसित देशांचे बॉण्ड् आकर्षक

जागतिक बॉण्ड उत्पन्न मजबूत राहिल्याने विकसित देशांमधील निश्चित-उत्पन्न मालमत्ता गुंतवणूकदारांसाठी अधिक आकर्षक आहे. याचा परिणाम उदयोन्मुख बाजारपेठेतील इक्विटीमधील गुंतवणुकीवर होत आहे. गुंतवणूकदारांची जोखीम घेण्याची क्षमता कमी होत आहे. एकूण विक्री असूनही परदेशी गुंतवणूकदार वीज, बांधकाम आणि भांडवली वस्तू या क्षेत्रांमध्ये निवडकपणे गुंतवणूक करित आहे. गुंतवणूकदार वाढत्या प्रमाणात मिड-कॅप आणि काही मजबूत स्मॉल-कॅप स्टॉक्सकडेही वळत आहेत. चांगल्या वाढीच्या शक्यता आणि मजबूत कमाईची कामगिरी असलेल्या कंपन्या गुंतवणूकदारांना आकर्षित करित आहे.

# देशासाठी धोक्याची घंटा, महागाई वाढणार

## जीडीपी वाढीचा वेग मंदावणार

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पश्चिम आशियातील संकट दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे. असे झाल्यास, भारतासाठी ते सर्वच बाबतीत हानिकारक ठरेल. आशियाई विकास बँकेचे (एडीबी) मुख्य अर्थतज्ज्ञ अल्बर्ट पार्क यांच्या मते, याचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर आणि देशाच्या विकास दरावर होईल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्ययांमुळे, 'महागाईचे संकट' पुन्हा एकदा भारतीय कुटुंबांचे बजेट उद्ध्वस्त करण्यासाठी सज्ज झाले आहे. पार्क म्हणाले की, आखाती संकटामुळे भारताचा जीडीपी वाढीचा दर ०.६ टक्क्यांनी कमी होऊन ६.३ टक्क्यांवर येईल. इतकेच नव्हे, तर चालू आर्थिक वर्षात महागाईत लक्षणीय वाढ होईल. एप्रिलमध्ये, एडीबीने असा अंदाज वर्तवला होता की, भारताचा जीडीपी वाढीचा दर चालू आर्थिक वर्षात ६.९ टक्के राहील. पुढील आर्थिक वर्षात तो ७.३ टक्क्यांपर्यंत वाढेल. महागाईबाबत, एडीबीने चालू आर्थिक वर्षात ती ४.५ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता.

**महागाई ६.९ टक्क्यांपर्यंत पोहोचणार**

पार्क म्हणाले, २०२६-२७ मध्ये विकासदर ०.६ टक्क्यांनी कमी होण्याची आमची अपेक्षा आहे. हे आमच्या आदर्श परिस्थितीवर आधारित आहे. तथापि, याचा पुढील वर्षीच्या विकास दरावर नकारात्मक परिणाम होणार नाही. भारत पुढील वर्षी पुन्हा उभारी घेईल. त्यांनी पुढे सांगितले की, यावर्षी महागाई २.४ टक्क्यांनी वाढून ६.९ टक्क्यांवर पोहोचेल. अल्बर्ट पार्क यांच्या मते, पश्चिम आशियातील संकट अधिक काळ टिकण्याच्या शक्यतेमुळे कच्च्या तेलाच्या बाजारात अनिश्चितता निर्माण झाली. पार्क यांच्या अंदाजानुसार २०२६ मध्ये कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रति बॅरल ९६ डॉलर इतकी अधिक राहू शकते. २०२७ मध्ये ती ८० डॉलरपर्यंत घसरण्याची शक्यता असली तरी, भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशासाठी पुढील २ वर्षे कठीण असतील.

### खतांच्या संकटामुळे उत्पादनात घट होण्याचा धोका



ते म्हणाले की, खतांच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी खतांचा वापर कमी करतील, त्यामुळे उत्पादन कमी होईल आणि वर्षाच्या अखेरीस उपलब्धता कमी होईल. याचा अन्नधान्याच्या किमतींवर निश्चितपणे परिणाम होणार आहे. परंतु, तो किती गंभीर असेल, याचा अंदाज केवळ गॅसच्या संकटाच्या आधारावरच लावता येईल. एल निनोचा अन्न उत्पादनावरील परिणामाबद्दल विचारले असता, पार्क म्हणाले, अर्थातच, हे खूप अनिश्चित आहे. साहजिकच, जेव्हा-जेव्हा भारतात पीक खराब होते. तेव्हा आम्हाला वाढलेल्या किमतींची समस्या भेडसावते. जागतिक तांदळाच्या व्यापारात भारताचा मोठा वाटा आहे.

# एफएमसीजी कंपन्या किंमती वाढवणार



**दिल्ली.** कच्च्या तेलाची वाढती महागाई, पॅकेजिंग साहित्य आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे साबण, डिटर्जंट, बिस्किटे, पॅकेज्ड खाद्यपदार्थ आणि पेयांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. देशातील आघाडीच्या फास्ट-मूव्हिंग कंझ्युमर गुड् (एफएमसीजी) कंपन्या वाढत्या खर्चामुळे नफ्यावर येणारा दबाव कमी करण्यासाठी टप्प्याटप्प्याने किमती वाढवण्याची तयारी करित आहे. एफएमसीजी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या तिमाही निकालादरम्यान सांगितले की, त्यांनी आधीच ३ ते ५ टक्क्यांनी किमती वाढवल्या आहे. खर्चाचा दबाव कायम राहिल्यास आणखी दरवाढ शक्य आहे. कंपन्यांच्या मते, पश्चिम आशियातील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे कच्चा माल, लॉजिस्टिक्स आणि पॅकेजिंगचा खर्च वाढला आहे. रुपयाच्या घसरणीमुळेही या दबावात भर पडली आहे. याचा परिणाम खाद्य उत्पादने, वैयक्तिक काळजी उत्पादने, पेये आणि घरगुती उपकरणे यांसारख्या अनेक क्षेत्रांवर होत आहे.

# पर्नोड रिकार्ड अडचणीत

## सीसीआयकडून चौकशीचे आदेश

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारतीय स्पर्धा आयोगाने आघाडीची फ्रेंच मद्य कंपनी पर्नोड रिकार्ड आणि इतर सात कंपन्यांवर इंडियन मेड फॉरेन लिकर (आयएमएफएल) बाजारातील संगनमत आणि स्पर्धाविरोधी पद्धतींच्या आरोपांची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश दिलेत.
चौकशी अंतर्गत असलेल्या इतर कंपन्यांमध्ये इंडो स्पिरिट्स, पाथवे एचआर सोल्युशन्स, युनिव्हर्सल डिस्ट्रिब्युटर्स, खाओ गली, बबली बेवरेजेस, शिव असोसिएट्स आणि ऑर्गॅनॉमिक्स इकोसिस्टम्स यांचा समावेश आहे. ५ मे रोजीच्या आपल्या २६ पानी आदेशात आयोगाने म्हटले आहे की, प्रथमदर्शनी असे दिसून येते की, पर्नोड रिकार्डने दिल्लीतील आयएमएफएल बाजारात मोठा वाटा मिळवण्यासाठी आणि आपल्या ब्रँडचा प्रचार करण्यासाठी किरकोळ विक्रेते आणि घाऊक विक्रेत्यांसोबत प्रतिबंधात्मक करार केले. सीसीआयच्या मते, असे वर्तन स्पर्धा कायद्यांतर्गत 'विशेष सौद्यासाठीचा करार' या श्रेणीत येते आणि कायद्याचे उल्लंघन असू शकते. या प्रकरणातील तक्रार २०२४ मध्ये आयोगाकडे दाखल करण्यात आली होती. आयोगाचे महासंचालक (डीजी) आता या प्रकरणाची सविस्तर चौकशी करतील. या कथित कारवायांमध्ये सहभागी किंवा सामील असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि व्यक्तींच्या भूमिकेचीही चौकशी केली जाईल. आयोगाने म्हटले की, किरकोळ विक्रेत्यांना कथितरित्या कॉर्पोरेट हमी देऊन पर्नोड रिकार्ड उत्पादनांची विक्री वाढविण्याच्या प्रयत्नांचा स्पर्धेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. आदेशात म्हटले आहे की, असा करार, जे प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या उत्पादनांच्या विक्रीवर मर्यादा घालतात, ते किरकोळ मागणी कृत्रिमरित्या पर्नोड रिकार्डकडे वळवू शकतात. त्यामुळे इतर कंपन्यांवर प्रतिकूल परिणाम होईल. सीसीआयने म्हटले की, अशा व्यवस्थांमुळे ग्राहकांच्या निवडीवर मर्यादा येऊ शकतात.

## Short News

### ॲक्सिस बँकेकडून एआयची सुविधा

**मुंबई.** ॲक्सिस बँकेने करंट अकाउंट खाते ग्राहकांसाठी एआय प्रणीत अनुपालन परिवर्तन उपायसुविधा सादर केली आहे. व्यवसायांसाठी पारंपरिकरीत्या जटिल, वेळखाऊ असलेल्या नियामक प्रक्रियांना सुलभ करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. नव्या सेवांमध्ये एआय प्रणीत केवायसी उपायसुविधा आणि एआय प्रणीत डिजिटल बिझनेस प्रोफाइल अपडेट सेवा यांचा समावेश आहे. या दोन्ही सेवा वेगवान, अचूक, डिजिटल अनुपालन असलेला अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आला.

### सोन्याच्या पुरवठ्यावर टायटनचा भरोसा

**दिल्ली.** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवरही आघाडीची ज्वेलरी कंपनी टायटन कंपनीने म्हटले आहे की, त्यांना अल्पावधीत सोन्याच्या पुरवठ्याबाबत कुठलीही चिंता नाही, कारण त्यांचा गोल्ड एक्सचेंज प्रोग्राम आणि पर्यायी पुरवठा योजना धोका कमी करण्यास मदत करित आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कंपनीची एकूण उलाढाल ७५,००० कोटी रुपयांच्या पुढे गेली. कंपनीने सांगितले की, त्यांचा गोल्ड एक्सचेंज प्रोग्राम तिसऱ्या तिमाहीपासून यशस्वीपणे सुरू आहे त्यामुळे ज्वेलरी व्यवसायासाठी सोन्याच्या उपलब्धतेमध्ये लवचिकता वाढली. कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अशोक सोनथालिया म्हणाले.

# रोज १७०० कोटींचे नुकसान

## तेल कंपन्यांवर मोठा आर्थिक भार

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक ऊर्जा किमतींमध्ये झालेल्या तीव्र वाढीचा भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील पेट्रोलियम कंपन्यांना मोठा फटका बसत आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन (एचपीसीएल) यांसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील पेट्रोलियम विपणन कंपन्या गेल्या १० आठवड्यांपासून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी जुन्याच किमतीत विकत आहेत, त्यामुळे त्यांना दररोज १,६००-१,७०० कोटी रुपयांचा तोटा (अंडर-रिकव्हरी) होत आहे.
या प्रकरणाशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, गेल्या १० आठवड्यांत या कंपन्यांची एकूण अंडर-रिकव्हरी १ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली आहे. अंडर-रिकव्हरी म्हणजे उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत विक्री करणे. कच्च्या तेलाच्या किमतीत जवळपास ५० टक्के वाढ होऊनही, देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती दोन वर्षांपूर्वीच्या पातळीवरच आहेत. दिल्लीत पेट्रोल ९४.७७ रुपये प्रति लिटर आणि डिझेल ८७.६७ रुपये प्रति लिटर दराने विकले जात आहे. दरम्यान, मार्च महिन्यात घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ६० रुपयांनी वाढ करण्यात आली. परंतु असे असूनही त्याची किंमत प्रत्यक्ष खर्चापेक्षा कमीच राहिली आहे. सूत्रांनुसार, पेट्रोलियम कंपन्यांना आता कच्च्या तेलाची खरेदी आणि कामकाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक खेळते भांडवल उभारावे लागू शकते.



### गुंतवणुकीवर होऊ शकतो परिणाम

जर कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती दीर्घकाळ टिकून राहिल्या, तर कंपन्यांना काही भांडवली खर्चाच्या योजनांना पुन्हा प्राधान्य द्यावे लागू शकते. तथापि, रिफायनरी विस्तार, ऊर्जा सुरक्षा पायाभूत सुविधा, इथेनॉल मिश्रण, जैवइंधन आणि ऊर्जा संक्रमणाशी संबंधित धोरणात्मक प्रकल्प सरकारी पाठिंब्याने सुरू राहतील. आणखी एका सूत्राने सांगितले की, पेट्रोलियम कंपन्यांच्या आर्थिक स्थितीवरील सततच्या दबावामुळे रिफायनरी, पाइपलाइन, धोरणात्मक साठवणूक व स्वच्छ इंधन प्रकल्पांमधील भविष्यातील गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. सूत्रांचे म्हणणे आहे की, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढविण्याचा निर्णय आता शासकीय स्तरावर घेतला जाईल. त्यांच्या मते, इंधन दरवाढ जवळपास अटळ झाली आहे, परंतु तिचे प्रमाण आणि वेळ सरकार ठरवेल.



# गिग वर्कर्स परतल्याने डिलिव्हरी झाली फास्ट

## डिलिव्हरीच्या वेळेत होत आहे सुधारणा

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** नुकत्याच झालेल्या राज्य निवडणुका आणि कापणीच्या हंगामानंतर मोठ्या संख्येने तात्पुरते कामगार (गिग वर्कर्स) शहरांमध्ये परतल्याने ऑनलाइन फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवरील डिलिव्हरीच्या वेळेत सुधारणा होत आहे. स्विगी आणि मॅजिकपिनसारख्या प्लॅटफॉर्मच्या मते, पुढील काही आठवड्यांत परिस्थिती सामान्य होण्याची अपेक्षा आहे. मॅजिकपिनचे संस्थापक आणि सीईओ अंशु शर्मा यांनी सांगितले की, आपल्या गृहराज्यात मतदान करण्यासाठी महानगरे सोडून गेलेले डिलिव्हरी रायडर्स आता परत येत आहे, परिणामी डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढली आहे. ते म्हणाले, या रायडर्सच्या परतण्यामुळे डिलिव्हरीच्या वेळेत सुधारणा होत आहे. तथापि, काही काळ किंचित चढ-उतार कायम राहू शकतात. शर्मा म्हणाले की, गेल्या काही महिन्यांच्या आव्हानात्मक काळानंतर फूड डिलिव्हरी क्षेत्रात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. २० टक्क्यांपर्यंत वाढ शक्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मॅजिकपिनने लहान व्यवसायांना मदत करण्यासाठी 'वेरा' नावाचा एक आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आधारित असिस्टंट सुरू केला आहे.

# डिमॅट खात्यातून करू शकता सोने खरेदी

## एनएसईने नवीन प्रणाली केली सादर; सुवर्ण बाजारात बदल

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारतात सोने हे केवळ गुंतवणुकीचे साधन नव्हे, तर ते परंपरा आणि विश्वासाशीही जोडलेले आहे. तथापि, सोने खरेदी करताना ग्राहकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. वेगवेगळ्या शहरांमधील किमतीतील तफावत शुद्धतेबद्दलची चिंता, सराफांवरील अवलंबित्व आणि लॉकरमध्ये सोने ठेवण्याचा अतिरिक्त खर्च ही गुंतवणूकदारांसाठी दीर्घकाळापासूनची आव्हाने आहेत. आता, नॅशनल स्टॉक एक्सचेंजने या समस्या कमी करण्याच्या दिशेने पाऊल उचलले आहे. एक्सचेंजने इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट (ईजीआर) प्रणाली सुरू केली. त्याद्वारे गुंतवणूकदार आता त्यांच्या डिमॅट खात्यातून प्रत्यक्ष सोने खरेदी करू शकतात. ईजीआर हे प्रत्यक्ष सोन्याचे प्रतिनिधित्व करणारे एक डिजिटल प्रमाणपत्र म्हणून काम करते. गुंतवणूकदारांचे सोने एका सुरक्षित तिजोरीत ठेवले जाईल आणि त्याची मालकी शेअर होल्डिंगप्रमाणेच त्यांच्या डिमॅट खात्यात दर्शविली जाईल.



### शुद्धता आणि किमतींमध्ये पारदर्शकता

आतापर्यंत, भारतातील सोन्याची बाजारपेठ अत्यंत असंघटित होती, जिथे शहरे आणि सराफांनुसार सोन्याच्या किमती आणि शुद्धतेमध्ये तफावत होती. ईजीआर प्रणालीमध्ये केवळ ९९९ आणि ९९५ शुद्धतेच्या सोन्याचा समावेश असेल. परिणामी ग्राहकांचा शुद्धतेवरील विश्वास वाढेल. सोन्याच्या किमतींमध्ये अधिक पारदर्शकता येईल. 'एक राष्ट्र, एक पारदर्शक सोन्याची किंमत' हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने हा उपक्रम मानला जातो.

**लहान गुंतवणूकदारांना फायदा :** या प्रणालीमुळे लहान गुंतवणूकदारही सोन्यामध्ये सहजपणे गुंतवणूक करू शकतील. केवळ १०० मिलीग्रॅम सोन्यापासून गुंतवणूक सुरू करता येईल, त्याची किंमत सुमारे १,५०० असू शकते. यामुळे मर्यादित बजेट असलेल्या गुंतवणूकदारांना सोन्याच्या बाजारात प्रवेश करणे सोपे होईल. ईजीआर प्रणालीमुळे गुंतवणूकदारांना घरी किंवा बँकेच्या लॉकरमध्ये सोने ठेवण्याची गरज भासणार नाही.

# अमेरिका आणि युरोपची उडाली झोप

## पुतिन यांनी खेळला मास्टरस्ट्रोक

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुमारे अडीच महिन्यांपूर्वी सुरू झालेले युद्ध शमण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. युद्ध सुरू झाल्यानंतर इराणने जगातील सर्वांत महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझचा सामुद्रधुनी बंद केला. त्यामुळे कच्चे तेल व एलपीजीच्या जागतिक पुरवठा साखळीत व्यत्यय आला. याचा परिणाम म्हणून कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली. दरम्यान, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या एका वक्तव्याने जागतिक ऊर्जा बाजारात खळबळ उडवून दिली. रशिया आणि चीन एका अत्यंत गंभीर तेल आणि ऊर्जा कराराच्या जवळ पोहोचले आहेत. जर चीन व रशिया यांच्यातील हा करार अंतिम झाला. तर अमेरिका आणि युरोपची झोप उडेल, हे निश्चित आहे. रशिया व चीन यांच्यातील हा करार केवळ दोन्ही देशांमधील व्यापारच नव्हे, तर युरेशियन खंडातील जीवाश्म इंधनाच्या प्रवाहातही परिवर्तन घडवून आणू शकतो. पुतिन यांच्या वक्तव्यानंतर, 'पॉवर ऑफ सायबेरिया-२' पाइपलाइनसंदर्भातील वाटाघाटी निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याची अपेक्षा आहे.

# विमान वाहतूक; पर्यटनाला वेग

**दिल्ली.** भारताच्या वेगाने विस्तारणाऱ्या विमान वाहतूक पायाभूत सुविधांमुळे आतिथ्य क्षेत्रालाही चालना मिळत आहे. वाढती हवाई वाहतूक, सुधारलेली प्रादेशिक कनेक्टिव्हिटी व नवीन शहरी कॉरिडॉरच्या विकासामुळे प्रमुख हॉटेल चेन विमानतळाजवळील मालमत्तांमध्ये गुंतवणूक वाढवत आहेत. हॉटेल उद्योगातील अधिकाऱ्यांच्या मते, नवीन विमानतळांच्या संख्येत वाढ आणि टियर-२ व टियर-३ शहरांशी सुधारलेली कनेक्टिव्हिटीमुळे विमानतळांजवळील हॉटेल्सना गती आली. ही हॉटेल्स प्रामुख्याने व्यावसायिक प्रवासी, ट्रान्झिट प्रवासी, एअरलाइन क्रू आणि एमआयसीई अभ्यागतांना सेवा देतात. रॅडिसन हॉटेल ग्रुपचे दक्षिण आशियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल शर्मा यांनी सांगितले.

# डिझेल एसयूव्ही अधिक महाग

## बीएस७ मानकांमुळे वाहन क्षेत्रात बदल घडू शकतात

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारतातील हॅचबॅक आणि सेडान खरेदीदारांनी डिझेलकडे पाठ फिरवली असली तरी, टॉर्कची आवड असणाऱ्या स्पोर्ट्स युटिलिटी व्हेइकल (एसयूव्ही), ऑफ-रोडर्स आणि लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी ते अद्यापही पसंतीचे इंधन आहे. या निष्ठावान ग्राहकवर्गामुळे, डिझेल प्रवासी वाहनांचा बाजारहिस्सा गेल्या तीन वर्षांपासून सुमारे १८ टक्के वर स्थिर राहिला आहे. तथापि, २०१२-१३ मधील ४७ टक्क्यांच्या उच्चांकावरून त्यात घट झाली. कारण प्रदूषणाचे कठोर नियम आणि उद्योगाचे पेट्रोल, सीएनजी व विद्युतीकरणाकडे झालेल्या स्थित्यंतरामुळे शहरी प्रवासी कारच्या बाजारपेठेतून डिझेल हळूहळू बाहेर ढकलले गेले. तथापि, उद्योग तज्ज्ञांच्या मते, बीएस७ उत्सर्जन मानकांमुळे खर्चात लक्षणीय वाढ होणार असल्याने, एसयूव्ही सेगमेंटवरील डिझेलची पकड कायम राहते की, अखेरीस तुटते, हे नियामक चक्र ठरवेल. डिझेल आता शहरी भागातील सुरुवातीच्या स्तरावरील खरेदीदारांसाठी स्पर्धा करित नाही. त्याऐवजी हे मोठ्या वाहनांमध्ये अधिक केंद्रित होते. जिथे ग्राहक इंधनाच्या प्रकारातील बदलापेक्षा खेचण्याची शक्ती, हायवे मायलेज आणि ड्रायव्हिंग रेंजला प्राधान्य देतात. बहुतेक वाहन उत्पादकांसाठी लहान डिझेल वाहनांमध्ये गुंतवणूक करणे, आता आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य राहिलेले नाही, त्यामुळे इंधनात गुंतवणूक करत राहणाऱ्या उत्पादकांचे बाजारातील वर्चस्व वाढत आहे. महिंद्रा अँड महिंद्राला याचा फायदा झाला आहे, कारण त्यांच्या स्कॉर्पिओ, थार आणि बोलेरो सारख्या डिझेलवर चालणाऱ्या एसयूव्हींना मागणी आहे. वाढते केंद्रीकरण आणि नियामक जोखमींच्या पार्श्वभूमीवर, महिंद्रा अँण्ड महिंद्रा एकाच इंधनावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी तंत्रज्ञानात स्थान मजबूत करत आहे.




**गट ग्रामपंचायत : वायगाव (घोटुर्ली)**
**पं. स. उमरेड, जि. प. नागपूर**

**ई-निविदा सुचना क्र. 1/2026-27**

सर्व ईच्छुक कंत्राटदार व पुरवठाधारकांना कळविण्यात येते की, सरपंच / ग्रा.पं. अधिकारी, गट ग्रामपंचायत वायगाव (घोटुर्ली) कडून ई-निविदा सुचना क्र. 1/2026-27 नुसार खालील कामाचे ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. ई-निविदा सुचना शर्ती व अटी तसेच निविदेची विस्तृत माहिती जिल्हा परिषद नागपूरच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे विवरण | ई-निविदा विक्रीचा दिनांक | ई-निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | सिमेंट काँक्रीट नाली बांधकाम करणे. मस्जिद मे राजकुमार सुर्यवंशी यांचे घरापर्यंत. वायगाव (घोटुर्ली) | दि. 08/05/2026 सकाळी 11.00 वा. ते दि 15/05/2026 सकाळी 11.00 वा. पर्यंत | दि. 16/05/2026 ला सकाळी 11.00 वा. नंतर |
| 2 | समाजभवन बांधकाम करणे, संत नगर वार्ड क्र. 1, वायगाव (घोटुर्ली) | | |
| 3 | पाणीपुरवठा योजना बांधकाम संत नगर, वायगाव (घोटुर्ली) | | |
| 4 | विविध बांधकामाकरीता वर्षिक साहित्य पुरवठा करणे. | दि. 08/05/2026 सकाळी 10.00 वा. ते दि 15/05/2026 दुपारी 02.00 वा. पर्यंत | दि. 16/05/2026 ला दुपारी 02.00 वा. नंतर |

सरपंच
गट ग्रामपंचायत वायगाव (घोटुर्ली)

ग्रा. पं. अधिकारी
गट ग्रामपंचायत वायगाव (घोटुर्ली)



महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया**

**ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिध्द करणे**

**ई-निविदा सुचना क्र. 02 ( सन 2026-27 ) प्रथम वेळ ( सुशिक्षित बेरोजगार अभियंता )**
**सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून ई-निविदा मागविण्याबाबत.**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालया अंतर्गत मंजूर कामांचे प्रपत्र बी-1 मध्ये दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत / वर्गीकरण केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडुन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिध्द कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधिल कामाबाबत अटी व शर्ती ई. संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिध्द दि. 11/05/26 पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुध्दिपत्रके सुध्दा वरिल संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येतील.

**ई-निविदा पध्दतीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक :- 11/05/26 पासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रांरभ (Start) | दिनांक :- 11/05/26 सकाळी 11.00 वाजेपासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | दिनांक :- 25/05/26 चे सायं. 5.00 वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन निविदा उघडणे. (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प. सा. बा. विभाग गोंदिया यांचे कक्षात संबधित निविदाधारकांचे समक्ष दिनांक:- 26/05/26 रोजी 5.30 वाजेपासुन लिफाफा क्रमांक - 1 उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

( प्रकाश ताकसांडे )
कार्यकारी अभियंता,
जि. प. सा. वा. विभाग, गोंदिया

( जनार्दन खोटरे )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

( डॉ. तानाजी लोखंडे )
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

DGIPR/2026-27/C 682



बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

**शाखा - गोपाल नगर, नागपूर**
प्लॉट नं. 9, माटे चौक, दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर - 440022

**वाहन ई-लिलाव सूचना**

याद्वारा सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना आणि जमानतदारांना सूचना देण्यात येत आहे की बँकेने पक्षांनी केलेल्या गहाणखत/कर्ज करारांतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले गहाण असलेले मोटार वाहन परत ताब्यात घेतले/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी वाहन **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे"** आणि **"जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार/जमानतदार/वाहन/एकूण देय/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली खालीप्रमाणे-

| अनु. क्र | कर्जदार/जमानतदार/ यांचे नाव आणि पत्ता | एकुण देय | वाहन निर्माता आणि मॉडेल आरटीओ नोंदणी क्रमांक | 1. ई-लिलावाची तारीख आणि वेळ<br>2. बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ | 1. राखीव किंमत<br>2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी)<br>3. बिड वाढीव रक्कम | ईएमडी ठेव खाते क्रमांक<br>आयएफएससी कोड<br>शाखा | वाहन / चल मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. दिनेश नरेंद्र पंधराम S/o. नरेंद्र पंधराम, पत्ता : वार्ड नं. 5, कांद्री माईन, पो. कांद्री माईन, तालुका रामटेक, नागपूर - 441106. | रु. 17,06,760/- लागु न झालेले व्याज + खर्च | टाटा मोटर्स गुड्स कॅरिअर ट्रक - टीआर<br>नोंदणी क्रमांक : MH-40-CM6312<br>नियमित वर्ष : 31/05/2023<br>मॉडेलचे नाव : टाटा मोटर्स लिमिटेड 1616 LPT DCR 49 HSD 160B6 M6<br>रंग : ब्रिक रेड<br>इंधन : डिझेल<br>इंजिन क्रमांक : 33LNGD11DWX511900<br>चेसिस क्रमांक : MAT563066P7D09002 | 28/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>28/05/2026 रोजी 18:00:00 वा. पर्यंत | रु. 11,34,000/-<br>रु. 1,13,400/-<br>रु. 10,000/- | खाता क्र. : 97850015181869<br>आयएफएससी कोड: BARB0DBNGOP (पाचवा अक्षर शून्य आहे)<br>बँक ऑफ बडोदा - गोपाल नगर शाखा नागपूर | तारीख: 21/05/2026 दुपारी 12:00 ते 15:00 वा.<br>यार्ड पत्ता: मेजर रिकवरी एजेंसी पवन गाव हिरता फॅक्ट्री, कळमना, नागपूर<br>अयाझ शेख<br>मो.नं. 7020758421 |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी आणि इतर शुल्कांसाठी, कृपया https://www.bankofbaroda.bank.in आणि https://baanknet.com या वेबसाइट लिंकचा संदर्भ घ्या/भेट द्या.
संभाव्य बोलीदार श्रीमती रशुका तिवारी, मोबाईल क्र. 9152941754 वर संपर्क साधू शकतात

दिनांक : 11/05/2026
स्थळ : नागपूर

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा